अबोली प्रतिष्ठान®

जनसेवा, न बोलता...

Email : contact@abolipratishthan.com

जळगाव

( For private circulation only )

॥ श्रीराम समर्थ ॥

खरंच का,
खरंच का,
खरंच का,
खरंच का,
खरंच का,

# बाबा वेडा आहे... ?

।। भगवान कांडेश्वरजी प्रसन्न ।।

न्हानकडो कांडेश्वर टुकवाले,

दोहिता सरदार ५०१ श्रीजी,

धर्मरक्षक विरचीत।

“वेडापुराण”

“Yeda Puran”

“Veda Puran”

“Weda Puran”

विमोचन : पौष पौर्णिमा

दि. १६-१-२०१४

बाबा नेहमी म्हणतात...

“बाबा वेडा आहे”

एकदा म्हटलं तर ठीक हो

पण., नेहमीच म्हणतात...

काही तरी तथ्य असेलंच ना

बाबा खोटं थोडी बोलणार आहे

आणि..., कधी - कधी... तर...,

आपल्याला पण शंका येतेच ना...?

**खरंच का... बाबा वेडा आहे...?**

म्हणे कवडाला जायचंय...

बायका पोरांसह जाऊन आले असते...,
येवढया १५० लोकांना न्यायची
काय आवश्यकता...?
अलीकडे लग्नाच्या वरातीत सुध्दा...,
एवढे व-हाडी नेत नाही...,
ते पण रक्ताचे - नात्यातले...

**खरंच का..., बाबा वेडा आहे...?**

इतरत्र २४ तास सेवा उपलब्ध चे
बोर्ड असतात...,
हे तर एका तासात गेट बंद करतात...,
हे शहाणपणाच्या कोणत्या तत्वात बसते...?

**खरंच का..., बाबा वेडा आहे...?**

दानधर्म..., आदिवासींना व गरीब विद्यार्थ्यांना...,
फुकटात औषधी व जीवनावश्यक वस्तुंचे वाटप
हे एकदा लक्षात आले हो...,
पण कल्पनेच्या बाहेरचे कर्ज घेऊन...?

**खरंच का..., बाबा वेडा आहे...?**



असं म्हणतात..., माणसाचे पूर्वज वानर होते..,

जेव्हा चार पायांवर चालणा-या वानरातल्या...,


एकाने दोन पायांवर चालण्याचा प्रयत्न केला असेल...,

तेव्हा इतरांनी त्याला वेडाच म्हटलं असेल

पण, त्यानेच किती मोठी क्रांती केली...?

ते ठीक आहे हो...,

**पण खरंच का..., बाबा वेडा आहें ?**



कैकयीला वचन रामाने नव्हते दिले...

दशरथान दिले होते...

ते वचन पाळण्याची रामाची जबाबदारी नव्हती...,

दशरथाने का रामाला विचारुन वचन दिले

होते...?

कारण नसतांना वनवासात गेले व

एवढे रामायण घडले.

खरंच का राम वेडा होता...?

ते जाऊ द्या हो...,

**पण खरंच का बाबा वेडा आहे...?**



एवढे दिवस चालले महाभारताचे युध्द,

लाखोंचा नरसंहार झाला...,
कितीतरी कुटुंबं कायमची उध्वस्त झाली...,
जर कृष्णाने शस्त्र हातात घेतले असते तर...,
एका दिवसात युध्द संपले असते...,
किंबहुना झाले पण नसते...,
कृष्णासारख्या देवाने सारथी व्हावे...,
खरंच का कृष्ण वेडा होता...?
ते जाऊ द्या हो...?

**पण खरंच का बाबा वेडा आहे...?**



गौतम आणि वर्धमान राजकुमार होते...,

सर्व सुखसोयी पायाशी होत्या...,
येवढे राजवैभव भोगता-भोगता पण
जनतेचे कल्याण करता आले असते...,
पण एवढे ऐश्वर्य सोडून..., संन्यास घेऊन
रानावनात फिरले..., अभिग्रहीत भिक्षा मिळाली
तर ठीक..., अन्यथा तसेच ध्यानस्थ राहीले...,
खरंच का ते वेडे होते ?
ते..., जाऊ द्या हो...,

**पण खरंच का बाबा वेडा आहे ?**



एकलव्याला द्रोणाचार्यांनी थोडी शिकवले होते...?

त्यांना गुरुदक्षिणा मागण्याचा हक्कच नव्हता...,
आणि जरी मागितली...,
तरी थोड्याफार स्वर्णमोहरा जास्तच झाल्या असत्या...,
त्यांनी मागितले आणि ह्याने अंगठा कापुन दिला...,
खरंच का हो तो वेडा होता...?
ते जाऊ द्या हो...,

**पण खरंच का बाबा वेडा आहे ?**




जहागिरदारी होती..., मस्तपैकी ऐश
केली असती..., कारण नसताना...,
स्वराज्याचे खुळ डोक्यात घालून...,
पदोपदी मृत्युशी झुंज देत राहीले...,
अशक्याला शक्य करण्याचे स्वप्न पाहणारे
शिवाजी खरेच का हो वेडे होते...?
तरी पण आज सुध्दा लोग म्हणतात...,
शिवाजी पुन्हा जन्माला आले पाहिजेत...,
पण आमच्या घरी नाही...,
ते जाऊ द्या हो...,

**पण..., खरच का..., बाबा वेडा आहे...?**



द. अफ्रिकेत वकीली जमली होती...,

मस्तपैकी सुटा-बुटात आयुष्य जगले असते...,
अर्ध्या धोतरावर..., एखाद्या फकिरा सारखे...,
तुरुंगात व उपवासात आयुष्य जगणारे...,
स्वतः पण लाठ्या खाणारे व लोकांना पण...,
निमुटपणे लाठ्या खायला प्रेरित करणारे...,
गांधी खरेच का वेडे होते...?
ते जाऊ द्या हो...,


**पण खरच का बाबा वेडा आहे...?**



बल्ब चा शोध लावतांना...,

५०० प्रयोग अयशस्वी झाले...,
तरीपण ५०१ वा प्रयोग करण्याची...,
त्याची तयारी..., मुर्खच ना...?
एकदा चुकला तरी अक्कल नाही आली...?
आणि म्हणतो काय...,
मी असे ५०० मार्ग शोधले...,
ज्या मार्गाने बल्ब बनू शकत नाही...,
खरंच का हो तो वेडा होता
ते जाऊ द्या हो...,


**पण खरंच का बाबा वेडा आहे...?**



### भुल देण्याचे औषध शोधुन...

संपुर्ण मानवतेवर उपकार करायला जाणा-यावर...,
बळजबरीने स्वतःच्या बायकोवरच पाहिला-
प्रयोग करायची पाळी आली...,
थोडी पण मात्रा जास्त झाली असती...
आणि ती मेली असती तर...?
कशाला रिकामे काम करायचे...?
खरंच का हो तो वेडा होता...?
ते... जाऊ द्या हो....

**पण... खरंच का बाबा वेडा आहे...?**



### रेनहोल्ड मेस्मनीर...

आठ हजार मीटर उंचीवरील सर्व १४ शिखरांवर
कृत्रिम प्राणवायुशिवाय चढण्याचा विडा उचलला...,
का तर म्हणे...‘अंतर्मनात खोल दडलेल्या...,
भिती..., आत्मविश्वासाचा अभाव...,
आदीचा वेध घेण्यासाठी...,
अरे..., दोन Horror चित्रपट पाहीले की...
भितीचा वेध घेता येईल ना...
त्या करता आयुष्यच डावावर लावणे हा
कुठला शहाणपणा...?
खरंच का हो तो वेडा होता...?
ते जाऊ द्या हो....
**पण खरंच का, बाबा वेडा आहे...?**



मोठ्यांच्या सर्वच गोष्टी मोठ्या असतात...,

जेथे-तुमचे-आमचे विचार संपतात...,
त्याच्या कितीतरी पुढून त्यांचे विचार सुरू होतात...,
त्यांचे कोणतेही पाऊल..., किंवा कोणतेही कार्य...,
विनाकारण नसत..., त्यांच्या प्रत्येक कार्यात...,
फार मोठ गुढ..., फार मोठा संदेश दडलेला असतो...,
तो काळाच्या ओघातच लोकांच्या लक्षात येतो...,
असे वेडेच क्रांती घडवतात...,
जग बदलण्याची धमक अशा वेड्यांमध्येच असते...,
तुम्ही-आम्ही मात्र उंबरावरचे किडे-मकोडे, उंबरी करती लिला,
८४ लाख योनीमधील एक जन्म संपन्न झाला...,
ते जाऊ द्या हो...,
मी कुठे म्हणतो...,
**बाबाच असं म्हणतात... बाबा वेडा आहे...!**

आमच्या सर्वांच्या मुर्खपणावर

त्यांचे हृदय करूणेने भरून येत असेल....
“अरे देवा..., येवढ्या वर्षांपासुन समजवतो
तरी पण?”
मग आम्हाला नकळत...,
योग्य मार्गाला लावत असतील...,
आणि मग आम्ही विस्मयतेने पाहताच...
म्हणत असतात...

**“... तु बरोबर आहे..., बाबाच वेडा आहे.”**

बाबा..., हा वेडेपणा आम्हाला समजणार नाही...

कारण की आम्ही तर..., ज्ञानी...? हुशार...?
व्यावहारीक?... Tax भरणारे ...?
सामाजिक भान असणारे...? संसाराच्या जबाबदारीची
जाणीव असणारे...?

जीवनाचा पाया श्रद्धेवर असावा..., ज्ञानावर नाही...,
श्रद्धेकरता माणुस शहीद होऊ शकतो,
ज्ञाना करता नाही...,
श्रद्धा हृदयाला आंदोलीत करते, प्रेरीत करते,
ज्ञान कदाचित हृदयापर्यंत पण पोहचत नाही ,
आम्ही आयुष्य पूर्ण करण्याकरता जगतो...,
तुम्ही - एक-एक क्षणाला अर्थ देत जगतात...,

आमच्या दुर्देवाने... सत्य उधार मिळत नाही...,

त्या करता स्वतःला झोकुन द्यावे लागते...,
झपाटल्यासारखे आयुष्य डावावर लावावे लागते...,
आणि मग झालीच तर कुठे...,
सत्याची अनुभुती होते...
काठावर चालणारे आम्ही...,
आणि मग नेमकी इथेच गोची होते...
आणि बाबा म्हणतात...
**"बाबा वेडा आहे"**
मान खाली घालून आम्हीही म्हणतो 'हो बाबा'

**- मिच्छामी दुक्कडम्**